www.newsdanka.com
राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक
आर.एन.आय. रजिस्ट्रेश क्र. : MAHMAR/2022/83413

मुंबई | मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ >> वर्ष ५ >> अंक १२६ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी

ईशानच्या त्रिशतकामुळे ईस्ट झोनने उभारला धावांचा डोंगर!
>> पान...६

संपादकीय
गारद्याचे बंड घडवेल महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप
>> पान...२

# नेपाळमधील जलप्रलयानंतर चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हला दणका

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुराने मोठ्या प्रमाणात जीवितहानीसह वित्तहानी केली आहे. अजूनही हजारोंच्या संख्येने लोक बेपत्ता असून शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच या महाप्रलयाने चीनच्या महत्त्वाकांक्षी बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (BRI) अंतर्गत प्रस्तावित तिबेट–काठमांडू रेल्वे प्रकल्पासमोरही मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहेत.

चीन–नेपाळ सीमेवरील महत्त्वाचे ग्यिरोंग सीमा बंदर पुरात जवळपास पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असून, या भागातून प्रस्तावित रेल्वेमार्ग नेण्याच्या योजनेच्या सुरक्षिततेबाबत तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे.

२६ ऑगस्ट रोजी हिमनदी कोसळल्यानंतर आलेल्या प्रचंड पूर आणि चिखलाच्या लोंढ्यांनी नेपाळ–तिबेट सीमावर्ती भागात मोठा विध्वंस घडवला. ग्यिरोंग लँड पोर्ट, रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधा माती व ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. बचाव पथकांना घटनास्थळी पोहोचल्यानंतर तेथे केवळ उद्ध्वस्त अवशेष दिसल्याची माहिती समोर आली आहे. चीन आणि नेपाळ यांच्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रस्ताव २०१६ पासून चर्चेत आहे. या प्रकल्पाअंतर्गत चीनच्या तिबेटमधील रेल्वे नेटवर्कला नेपाळची राजधानी काठमांडूशी जोडण्याची योजना आहे. हा मार्ग शिगात्से ते ग्यिरोंग आणि तेथून काठमांडूपर्यंत जाणार आहे.

हिमालयातील अत्यंत कठीण आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील प्रदेशातून हा रेल्वेमार्ग नेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रस्तावित नेपाळी भागातील रेल्वेमार्गाचा मोठा हिस्सा बोगदे आणि पुलांमधून जाणार असल्याने हा जगातील सर्वात आव्हानात्मक रेल्वे प्रकल्पांपैकी एक मानला जातो. ग्यिरोंग सीमा चौकी चीन आणि नेपाळमधील व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. चीनकडून नेपाळमध्ये जाणाऱ्या मालवाहतुकीसाठी हा प्रमुख मार्ग असून, कैलास–मानसरोवर यात्रेसाठीही या परिसराला विशेष महत्त्व आहे.

मात्र, ग्यिरोंग परिसरात झालेल्या भीषण विध्वंसामुळे हिमालयातील अशा मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. हिमनदी कोसळणे, भूस्खलन, पूर आणि भूकंपाचा धोका असलेल्या या प्रदेशात रेल्वेसारखा मोठा प्रकल्प उभारताना आपत्ती व्यवस्थापन आणि पर्यावरणीय सुरक्षेला अधिक प्राधान्य देण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. विशेषतः प्रस्तावित रेल्वेमार्गासाठी बोगदे, पूल आणि उंच पर्वतीय भागातून मोठ्या प्रमाणावर बांधकाम करावे लागणार आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या आपत्तीमुळे प्रकल्पाच्या डिझाइन, मार्ग निवड आणि आपत्तीप्रतिबंधक उपाययोजनांचा नव्याने विचार करावा लागण्याची शक्यता आहे.



# दिशा सालियन प्रकरणात सचिन वाझे होणार साक्षीदार ?


## वकिलांनी दिलेल्या माहितीमुळे प्रकरणाला खळबळजनक वळण



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात सोमवारी खळबळजनक माहिती समोर आली. रिपब्लिक टीव्हीवर या प्रकरणातील दिशा सालियनची बाजू मांडणारे वकील ॲड. ओझा यांनी सांगितले की, या प्रकरणातील महत्त्वाची माहिती देण्याची तयारी सचिन वाझे याने दाखविलेली आहे. या प्रकरणाशी संबंधित १३ लोकांचे खून झाले त्याविषयी माहिती देण्याची त्याची तयारी आहे.





रिपब्लिकवर ओझा यांनी सांगितले की, दिशा सालियन प्रकरणात एक महत्त्वपूर्ण साक्षीदार आहे तो आरोपी पण आहे. तो आहे सचिन वाझे. सचिन वाझेच्या वतीने प्रस्ताव घेऊन काही लोक आपल्याकडे आले होते. यात त्यांच्यातर्फे ऑफर देण्यात आली की, सचिन वाझे १३ खुनांमध्ये या प्रकरणाशी संबंध असलेल्या प्रकरणात तो आहे आणि त्याची माहिती देण्यास तयार आहे.

ओझा म्हणाले की, ९ जून २०२०ला दिशाचा मोबाईल रोहन रायकडून घेण्यात आला. त्यानेही ती कबुली दिली. पण नंतर तो फोन ॲक्टिव्ह दिसला. पण त्याबद्दल सांगितले गेले की, सुशांतच्या मृत्यूनंतर तो चेक करण्यासाठी सुरू करण्यात आला. हेदेखील मीडिआत प्रसिद्ध झालेले आहे.

>> सविस्तर वृत्त...२

# पंतप्रधान मोदींबद्दल अपशब्द वापरणाऱ्या निशू आझादला हाकलून लावा!

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

## गाझियाबादमधील रहिवाशांची संतप्त मागणी



कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनातून पुढे आलेल्या निशू आझाद नावाच्या मुलीविरोधात आता ती राहात असलेल्या सोसायटीतील सर्व सदस्य एकवटले आहेत. तिच्यामुळे सोसायटीत एकप्रकारे अशांततेचे वातावरण तयार झाले असून त्यामुळे आमच्या मुलाबाळांबाबत चिंता वाटू लागली आहे, असे सोसायटीतील सदस्य बोलू लागले आहेत.

यासंदर्भात या सदस्यांच्या प्रतिक्रिया समोर आल्या असून त्यातून निशू आझादच्या कुटुंबाला सगळे कंटाळले आहेत आणि त्यांना या सोसायटीतून हाकलून लावण्याची मागणी हे सदस्य करत आहेत. त्यात प्रामुख्याने महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

निशू आझादने तेव्हा जंतर मंतर येथील आंदोलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींसंदर्भात अत्यंत अभद्र व्हीडिओ केला होता. त्यानंतर ती चर्चेत आली. त्याच आंदोलनादरम्यान स्वतंत्र भारद्वाज या तरुणाने मारल्याचा दावा तिचे वडीलही करत होते. स्वतंत्र भारद्वाज याने एका मुलाखतीतही आपण तिच्या वडिलांचे डोके फोडल्याचा दावा केला होता. पण आंदोलनादरम्यानच्या व्हीडिओत तिचे वडीलही स्वतंत्र भारद्वाजला मारहाण करत असल्याचे समोर आले. आता स्वतंत्र भारद्वाजला अटक करण्यात आली आहे. मात्र आता निशू आझादने आपल्या घरावर हल्ला केला जात असल्याचा नवा व्हीडिओ केला आहे. भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आपल्या घरावर दगडफेक केली जात असल्याचा व्हीडिओ तिने केला आहे. आपल्याला संरक्षण हवे अशीही तिची मागणी आहे. माझ्या पालकांना काही झाले तर मी काय करू, असे ती व्हीडिओत म्हणत आहे.

निशू आझादच्या या सातत्याने केल्या जाणाऱ्या व्हीडिओमुळे गाझियाबाद येथील तिच्या निवासस्थानाच्या परिसरात एक अशांतता, अस्वस्थता निर्माण झाल्याची स्थानिकांची भावना आहे.

>> सविस्तर वृत्त...४

# लखीमपूरमध्ये चिमुकलीवर बलात्कार करणाऱ्या खलीलचे बारा तासात एन्काऊंटर

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

लखीमपूर खेरीच्या सिंगाही पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याच्या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाला होता. त्याला वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन जात असताना त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. सुमारे १२ तासांनंतर पोलिसांनी चकमकीनंतर आरोपीला अटक केली. प्रत्युत्तरादाखल करण्यात आलेल्या गोळीबारात त्याच्या डाव्या पायाला गोळी लागली आहे.

>> अधिक वृत्त...३



### नातेवाईकांनी सिंगाही-बेलरायां मार्ग केला ठप्प

**घटनेमुळे संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी आणि विविध संघटनांनी आरोपीविरोधात कठोर कारवाई तसेच बुलडोझर कारवाईची मागणी केली होती. नागरिकांनी सिंगाही-बेलरायां मार्ग रोखून धरला होता. त्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चार पोलीस ठाण्यांमधील पोलीस दलाच्या मदतीने परिस्थिती नियंत्रणात आणली.**

## बलात्कारी वलीन, सलमान एन्काऊंटरमध्ये जखमी

**उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर येथे १४ वर्षीय मुलीचे अपहरण आणि तिच्यावर कथित बलात्कार केल्याप्रकरणी फरार असलेल्या दोन आरोपींना पोलिसांनी चकमकीनंतर अटक केली. छपार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेता नगला गावाच्या जंगलात ६ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, वलीन आणि सलमान अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांच्या प्रत्युत्तरादरम्यान दोघांच्या पायाला गोळ्या लागल्या. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.**

>> सविस्तर वृत्त...५

# भारताला जितके तेल हवे, तितके देण्यास रशिया तयार

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**भारत आणि रशिया यांच्यातील द्विपक्षीय संबंध जगजाहीर असताना आता रशियाने पुन्हा एकदा कच्च्या तेलाच्या पुरवठ्यासंदर्भात भाष्य केले आहे. भारताच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी रशिया आवश्यक तेवढ्या प्रमाणात कच्च्या तेलाचा पुरवठा करण्यास पूर्णपणे तयार असल्याचे रशियाचे भारतातील राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी स्पष्ट केले आहे.**



भारताने रशियाकडून तेल खरेदी केल्यास अमेरिकेकडून १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याच्या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर अलीपोव्ह यांनी अमेरिकेसह पाश्चिमात्य देशांच्या धोरणावर जोरदार टीका केली. त्यांनी या कारवाईला भारतावर दबाव आणण्याचे तंत्र असल्याचे म्हटले आहे.

रशियाकडून तेल खरेदी करणे हा भारताचा स्वतःचा निर्णय असून, भारत ही खरेदी रशियाला मदत करण्यासाठी नव्हे तर आपल्या १४० कोटी नागरिकांच्या विकासासाठी आणि ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी करत असल्याचे अलीपोव्ह यांनी सांगितले.

>> सविस्तर वृत्त...५

